**प्रेस नोट**

**दिनांक ०१/१२/२०२४ ते दि. ३१/१२/२०२४ या कालावधीत मुंबई शहरामध्ये राबविण्यात येणा-या "ऑपरेशन मुस्कान १३" ही शोध मोहिम व हरविलेल्या १८ वर्षावरील महिलांबाबत विशेष शोध मोहिमे दरम्यान नागरिकांनी मदत करण्यासंदर्भात प्रेस नोट**

........................................................................................................................................

मुंबई शहरामधुन हरविलेल्या/अपहरण झालेल्या १८ वर्षाखालील मुले/मुली व १८ वर्षावरील हरविलेल्या महिलांचा शोध/तपास करण्यासाठी दिनांक ०१/१२/२०२४ ते दि. ३१/१२/२०२४ या कालावधीत मुंबई शहरामध्ये **"ऑपरेशन मुस्कान १३" ही शोध मोहिम व हरविलेल्या १८ वर्षावरील महिलांबाबत विशेष शोध मोहिमे**चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कालावधीमध्ये मुंबई शहरातुन १८ वर्षाखालील हरविलेली जास्तीत जास्त बालके व १८ वर्षावरील हरविलेल्या महिला मिळुन येण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येणार आहे. सदर मोहिम यशस्वी होण्यासाठी मुंबई मधील नागरिकांनी पोलीस/बालकांसंदर्भात काम करणा-या विविध अशासकीय संस्था यांना मदत केल्यास जास्तीत जास्त हरविलेल्या/अपहरण झालेल्या बालकांचा शोध घेण्यास मदत होणार आहे. तरी मुंबईमधील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपल्या परिसरामध्ये संशयास्पद लहान बालके मिळुन आल्यास अगर त्यांच्याबाबत काही माहिती मिळाल्यास खालीलप्रमाणे माहिती संबंधीत विभागांना देवून सदरचा उपक्रम चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी मुंबई पोलीसांना मदत करावी.

- कोणताही संशयीत लहान मुलगा/मुलगी मिळुन आल्यास त्यांच्याकडे चौकशी करावी व काही संशयीत वाटल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा अगर सदर बालकास तात्काळ जवळच्या पोलीस ठाणेस घेवून जावे.
- दि.०१/१२/२०२४ ते दि. ३१/१२/२०२४ या कालावधीत रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भिक मागणारी अथवा कचरा गोळा करणारी लहान मुले/मुली, धार्मिकस्थळे, रुगणालये, हॉटेल्स, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी लहान मुले/मुली मिळून आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- आपण रहात असलेल्या परिसरामध्ये लहान मुले/मुली काम करीत असल्याचे मिळून आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर/बस स्टेशन बाहेरील परिसर या ठिकाणी बेवारस स्थितीत लहान मुले/मुली मिळुन असल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- आपल्या राहत्या परिसरात नातेवाईकांकडे राहणारी लहान मुले यांचेबाबत काही संशय असल्यास त्याबाबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.
- एखादा अल्पवयीन मुलगा/मुलगी संशयीत वाटल्यास त्याबाबत **https://missionvatsalya.wcd.gov.in** या बेवसाईटवर जावुन khoya paaya या पोर्टलवर मुलगा/मुलीचा फोटो अपलोड करावा.
- आपल्या आजुबाजुच्या परिसरामध्ये कोणी लहान मुलगा/मुलगी घरकाम करताना मिळुन आल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १०० अगर १०९८ या क्रमांकावर कळवावे अगर लगतच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

....................................

Scanned with CamScanner